GALAXY LINK - ISSN 2319-8508 - IMPACT FACTOR - 3.555

ESTD: Jun 1970

मराठवाडा लिगल ॲण्ड जनरल एज्युकेशन सोसायटीचे,

## डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालय, औरंगाबाद

(कला, वाणिज्य व विज्ञान)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

द्वारा प्राप्त अनुदान

एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

मराठी विभाग

# "मराठी भाषेचे विविध क्षेत्रातील उपयोजन आणि सर्जन"

दिनांक - २५ फेब्रुवारी २०१७

मुख्य संपादक

प्राचार्या डॉ. राजकुमारी गडकर

संपादक

प्रा. डॉ. मीनाक्षी देव

प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर

अजिंठा प्रकाशन

जयसिंगपूरा, औरंगाबाद.

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | भाषा व आर्थिक वर्ग व्यवस्था<br>प्रा. डॉ. वसुधा व्ही. पुरोहित | ५६-५८ |
| १६ | प्रसारमाध्यमे व भाषिक कौशल्ये<br>प्रा. डॉ. सुशीला फुले | ५९-६१ |
| १७ | व्यक्तीमत्व विकास आणि भाषिक कौशल्य<br>डॉ. समिता जाधव | ६२-६३ |
| १८ | मुद्रित-शोधन : एक महत्त्वपूर्ण व्यवसाय<br>प्रा. डॉ. वृंदा देशपांडे-जोशी | ६४-६६ |
| १९ | प्रसार माध्यमे आणि जाहिरात लेखन<br>डॉ. गजानन पांडुरंग जाधव | ६७-६९ |
| २० | वृत्तपत्रीय लेखनाचे तंत्र व महत्व<br>प्रा. डॉ. संतोष देशमुख | ७०-७१ |
| २१ | भाषांतर ही एक सर्जनशील 'कृती'<br>प्रा. सुर्यवंशी संगीता | ७२-७७ |
| २२ | वृत्तपत्रीय जाहिरात लेखनकला : एक आकलन<br>डॉ. गायत्री गाडेकर | ७८-८६ |
| २३ | अनुवादमिमांसेतील अनुबंध : संस्कृतीचे वहन<br>डॉ. देविदास मल्लप्पा तेलंगे | ८७-९१ |
| २४ | वर्तमानपत्रासाठी विविध प्रकारचे लेखन कौशल्य<br>प्रा. संदीप परदेशी | ९२-९३ |
| २५ | आकाशवाणी, दुरचित्रवाणी व साहित्यव्यवहार<br>प्रा. डॉ. अनिता प. खंडागळे | ९४-९७ |
| २६ | प्रसार माध्यमे व जाहिरात लेखन<br>प्रा. वंदना सा. पाटील | ९८-१०१ |
| २७ | व्यक्तीमत्व विकास व भाषिक कौशल्य<br>प्रा. डॉ. रामकिशन दहिफळे | १०२-१०४ |
| २८ | प्रसार माध्यमे आणि मराठी भाषेचे बदलते स्वरुप<br>डॉ. कैलास इंगळे | १०५-१०७ |
| २९ | जागतिकीकरण यगात प्रसार माध्यमे व मराठी भाषिक कौशल्याचे महत्व<br>प्राचार्य डॉ. बाळासाहेब बी. लिहीणार | १०८-११० |




Scanned with CamScanner

 GALAXY LINK - ISSN-2319-8508 - IMPACT FACTOR - 3.555

# २४ वर्तमानपत्रासाठी विविध प्रकारचे लेखन कौशल्य

**प्रा. संदीप परदेशी**
सहाय्यक प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड.

## प्रस्ताविक

आपल्या दररोजच्या जीवनात वर्तमानपत्राचे महत्त्व आता सर्वमान्य झाले आहे. विशेषतः लोकशाही शासनव्यवस्था असणाऱ्या देशामध्ये तर वर्तमानपत्राचे महत्त्व निश्चितच मोठे आहे. आपले गाऱ्हाणे मांडण्याचे लोकशाही मार्गावरचे हक्काचे साधन म्हणून सर्वसामान्य नागरिक वर्तमानपत्राकडे पाहतात. या शिवाय शिक्षण देणे, माहिती पुरवणे, मनोरंजन करणे, प्रबोधनासाठी पूर्वतयारी या दृष्टीनेही वर्तमानपत्राचे स्थान मोठे आहे. भारतासारख्या किसनशील देशातील वर्तमानपत्रांची जबाबदारी फार मोठी आहे. गेल्याकाही वर्षांत वर्तमानपत्राला मागे सारणाऱ्या, ताज्या बातम्या सलगपणे देणाऱ्या अनेक वृत्त वाहिन्या इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सुरू झाल्या आहेत. परंतु वर्तमानपत्रांचे महत्त्व तसूभरही कमी झालेले आपल्याला दिसत नाही. हे ही लक्षात घ्यायला हवे.

वृत्तपत्र म्हाजेच बातमी अथवा वृत्त देणारे पत्र म्हणजेच बातम्या देणारे, माहिती देणारे साधन वर्तमानपत्र होय. कोणत्याही वर्तमानपत्राचे मुख्य भांडवल असते ती बातमी एखाद्या चांगल्या, चवदार भोजनासाठी मसाला अणि मीठ आवश्यक असते, तसेच चांगल्या वर्तमानपत्रासाठी बातम्या आवश्यक असतात. या मूळ भांडवलावरच बातम्यांची रचना होत असते. याच अनुशंगाने प्रस्तृत शोधनिबंधातून बातमी, बातमीची रचना, बातमीचे स्त्रोत, बातमीची भाषा या घटकांचा आढावा घेण्यात आला आहे.

## बातमी व्याख्या व स्वरूप

बातमीची परिपूर्ण अशी व्याख्या देता येणार नाही. सर्वसाधारणपणे ज्या घटना वर्तमानपत्रात छापून येतात त्यांना बातमी असे म्हणता येईल. तरी बातमीचे स्वरूप स्पष्ट करणाऱ्या सर्वसमावेशक व्याख्या देण्याचा प्रयत्न पत्रकारितेच्या क्षेत्रातील काही अभ्यासकांनी केला आहे. त्या अशा -

१) बातमी म्हणजे अनेक लोकांना ज्यात रस वाटेल अशा नुकत्याच घडलेल्या घटनेची वस्तुनिष्ठ माहिती.

२) पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण याचारही दिशाच्या कक्षेत घडणारी महत्त्वपूर्ण घटना.

३) एखाद्या घटनेचा अचुक व समयोजित तपशील म्हणजे बातमी होय.

थोडक्यात असे म्हणता येईल की, समाजातीच जास्तीत जास्त लोकांना ज्या बद्दल उत्सुकता आहे, कुतूहल आहे अशा घटना बातम्या बनतात.

`दी सन` या इंग्रजी वर्तमानपत्राच्या संपादकांनी बातमीची दिलेली व्याख्या मोठी लक्षणीय आहे. ते म्हणतात, ``जेव्हा कुत्रा माणसाला चावतो, तेव्हा त्यात बातमी नसते, पण माणूस कुत्र्याला चावला की बातमी होते. यावरून एखादी घटना केंव्हा बातमी होऊ शकते हे आपल्या लक्षात येऊ शकते. समयोजीतता, स्वारस्य, परिणाम हे बातमीचे तीन प्रमुख घटक आहेत.

लढत, परिणामकारकता, प्रगती, व्यक्ती महात्म्य, ताजेपणा व लोकरूची हे बातमीचे मुल्य घटक आहेत.

## बातमीची लेखनपद्धती

बातमी लेखन करत असतांना ती ज्यातून तयार होते असे सहा `क` कार आहेत कोण, काय, कोठे, केव्हा, का आणिकसे या सर्वांची उत्तर म्हणजे बातमी लेखन यातील एखादा `क` कार नसला तरी बातमी अपूर्ण वाटते. बातमी आणि त्याला जोडूनच पण त्यापूर्वी शब्द येता, ता



Scanned with CamScanner

...णे बातमीमूल्य असलेली घटना ही असते बातमी घडत असलेली घटना, त्यातील मानवी जीवनाशी संलग्न असलेले तपशील, उत्कर्ष किंवा अपकर्षाचे संदर्भ, या साऱ्या गोष्टी बातमीमध्ये असतात.

**बातमीचे स्त्रोत**

'द न्यूजपेपर्स हॅण्ड बुक' चे लेखक रिचर्ड कीबल यांनी म्हटल्याप्रमाणे वृत्तपत्रांच्या बातम्यांची उगमस्थाने प्राथमिक आणि दुय्यम स्तरावरची असतात. प्राथमिक टप्यातील स्त्रोत थेट स्वरूपाचे असतात. बहुतेक सगळ्या घडामोडी त्यातूनच वार्तांच्या रूपाने दिल्या जातात. हे स्त्रोत कोणते असतात? केवळ कीबलच नव्हे तर अनेक वृत्तपत्रा विदया विषयावरील लेखकांनी या स्त्रोतांचा उल्लेख केला आहे ते स्त्रोत असे (१) संसद भवन (२) विधानभवन (३) न्यायालये (४) नगर पालिका (५) पोलीस आयुक्त कार्यालये (६) खेळांची मैदाने (७) उदयोग क्षेत्रातील संघटना (८) शेती-सहकार-शिक्षण आरोग्य यांच्याशी संबंधित प्रमुख सरकारी कार्यालये (९) वाङ्मयीन संस्था, विद्यापीठे, परीक्षा मंडळे, नाट्य निर्मिती संस्था (१०) राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि नेते, कामगार संघटनांचे नेते (११) बिगर शासकीय स्वयंसेवी संघटना (१२) न्यायालयाचे निवाडे (१३) सर्वसामान्य लोक (१४) दबावगट (१५) विश्वसनिय सूत्रांकडून मिळणारी बातमी.

**बातमीची रचना**

बातमीतील सर्वात महत्त्वाचा भाग अग्रपरिच्छेदात येतो. त्यानंतर कमी महत्त्वाचा मुद्दा येतो. सर्वात कमी महत्त्वाचा मुद्दा सर्वात शेवटी येतो. आशयाच्या दृष्टीने बातमीच्या या रचनेला उलटा त्रिकोण (Inverted Phyramid) असे म्हणतात.

बातमीतील अत्यंत कमी महत्वाची माहिती शेवटी येते. किरकोळ तपशील नंतरच्या क्रमावर येतो. त्यानंतर कमी महत्त्वाची माहिती येते. अश क्रमाने बातमीची रचना असते. वर्तमानपत्रात जागेची मर्यादा असते उशिरा किंवा एनवेळी एखादी बातमी आली तर अशी आलेल्या बातमीतील काही मजकूर कमी करणे् आवश्यक होते. अशा वेळेस बातमीतील शेवटचे परिच्छेद वगळले तरी बातमीच्या महत्वाच्या भागाला धक्का लागू नये, या दृष्टीने बातमीची बांधणी करणे अत्यंत गरजेचे ठरते.

**बातमीची भाषा**

प्रत्येक वर्तमानपत्राने आपल्या स्वरूपाला साजेशी भाषा स्विकारलेली असते. कोणते शब्द वापरायचे, नावांचा उल्लेख कसा करायचा, चिन्हांचा वापर किती करायचा, या सर्वांवर बातमीची भाषा अवलंबुन असते. अधिकाधिक वाचकांना बातमी समजावी म्हणून वर्तमानपत्रे मुख्यतः सोपी, सुटसुटीत भाषा आणि छोटी छोटी वाक्य रचना यांच्यावर भर देतात. कमीत कमी शब्दांचा वापर करूनच बातमी लिहावी लागले. पाल्हाळीक लिहून, निबंधवजा लिहून बातमी करणे चुकीचे आहे. वर्तमानपत्रांमधून सोपे शब्द वापरताना बातमीतील तपशील किंवा त्यातील गुंता याबाबत वाचक अडखळणार नाहीत, याची काळजी घ्यावी लागते.

**सारांश**

वर्तमानपत्रांच्या या विश्वात आपण आतापर्यंत बातमी म्हणजे काय? बातमीचे स्त्रोत, रचना, भाषा या गोष्टी विचारात घेतल्या. कारण साध्या माणसाच्या जगण्याच्या प्रश्नापासून ते एखादा देशाला हादरवून सोडणाऱ्या घटनेपर्यंतचा आलेख बातम्यांच्या जगात रेखाटला जात असतो.

नव्याने जागे होणारे उपेक्षित वंचित वर्ग आणि ज्यांच्यापर्यंत माध्यमांनी जायला हवे असे दुर्बल घटक या साऱ्यांसाठी आता बातम्यांचे क्षेत्र खुले झाले आहे. या दबलेल्या क्षीण आवाजातील वर्गासाठी वर्तमानपत्रांची भूमिका आता अधिक समावेशक आणि सहभागाची झाली आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१) उपयोजित मराठी - डॉ. प्रकाश मेदककर

२) मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

३) मुद्रित माध्यमांसाठी लेखक कौशल्ये - डॉ. सदाशिव सरकटे



Scanned with CamScanner